<u>प्रेसनोट</u>

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०१/१०/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १) श्री.तपन रमेश राठोड, वय ३६ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद –वरिष्ठ तंत्रज्ञ (वर्ग ३), म.रा.वि.वि.कंपनी मर्या.धारणी, ता.धारणी, जि. अमरावती, राह. होली चौक,धारणी |
| ३ | अपराध घडला दिनांक व वेळ | दिनांक ०१/१०/२०२५ रोजी १४.३० ते १५.०१ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | १०,०००/–रुपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १०,०००/–रुपये |
| ६ | घटनास्थळ | डेली डिलाईटस,ड्रायफ्रुट दुकान,चर्च जवळ,मेन रोड,धारणी |

**थोडक्यात हकिगत :–** यातील तक्रारदार यांना एम.एस.ई.बी. धारणी येथील श्री.तपन राठोड साहेब यांनी '' तुझ्या दोन भाडयाने दिलेल्या दुकानामध्ये तू जे सबमिटर लावलेले आहेत त्यावरून तू विज विकत आहे असे दिसुन येत आहे त्यावर कारवाई होउन तुझेवर गुन्हा दाखल होईल तेव्हा तू मला १०,०००/– रूपये दे मी लगेच तूझे सेटलमेंट करून देतो असे म्हणुन लाच रक्कमेची मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी दिनांक ३०/०९/२०२५ रोजी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०१/१०/२०२५ रोजीचे शासकिय पंचासमक्ष पडताळणीमध्ये आलोसे श्री. तपन राठोड यांनी तक्रारदार यांनी त्यांचे दोन दुकानामध्ये जे सबमिटर लावलेले आहेत त्यावरून विज विकत असल्याची कारवाई होउन गुन्हा दाखल न होणेकरीता १०,०००/–रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/–रू. लाच रक्कम स्विकारण्याची समंती दर्शविली.

दिनांक ०१/१०/२०२५ रोजी शासकिय पंचासमक्ष आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्री.तपन राठोड यांनी लाच रक्कम खाजगी इसम नुरूल हक अब्दुल हक,वय–२८ वर्ष धंदा – डेली डिलाईटस,ड्रायफ्रुट दुकान,रा.चर्चजवळ,मेन रोड ,धारणी यांचेकडे देण्यास सांगीतल्याने त्याप्रमाणे खाजगी इसम नुरूल हक अब्दुल हक यांनी १०,०००/–रू. लाच रक्कम पंचासमक्ष डेली डिलाईटस,ड्रायफ्रुट दुकान,चर्च जवळ,मेन रोड,धारणी येथे स्विकारले, त्याच वेळेला पथकाने आलोसे श्री.तपन राठोड यांना त्यांचे कार्यालयातुन ताब्यात घेतले आहे. वरून आलोसे श्री.तपन राठोड यांचेवर पो.स्टे.धारणी, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली,पर्यवेक्षण अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, सापळा अधिकारी पोनी ज्ञानोबा फड, पोलीस अंमलदार वैभव जायले, आशिष जांभोळे , चालक पोउपनि श्री. सतिश किटुकले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क: १)मा.श्री.मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र**
**मो.क्र.९८५०४८८७८८**
**२)श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र**
**मो.क्र.९७६४२१०४८५**
**३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती**
**मो.क्र.९८२३१११९५५,७५१७५७१०६४**
**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, प्रांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८१, टोल फ्रि नंबर–१०६४**

**(ज्ञानोबा फड)**
**पोलीस निरीक्षक**
**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती**